# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक ०६.०८.२०२६ गुरुवार**

**नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातर्फे जनतेला आवाहन : डायल ११२—एक कॉल, अनेक सेवा, तत्पर मदत**

नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत नागपूर पोलीस दल हे सर्वसामान्य जनतेच्या सेवेत २४ तास तत्पर असते. सर्वसामान्य जनतेस गुन्ह्यासंबंधाने अथवा कोणत्याही अडीअडचणीचे वेळीस पोलीसांची मदत मिळावी याकरीता शासनस्तर तसेच पोलीस खातेस्तरावरून पोलीस नियंत्रण कक्ष येथे मदतीकरीता डायल ११२ वर संपर्काची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सर्वसामान्य जनतेस आवाहन करण्यात येते की, त्यांनी महिलासुरक्षा, घरगुती हिंसाचार, आगीच्या घटना, अपघात, गुन्ह्यांची/गुन्हेगारांची/अनैतिक कृत्य/असामाजिक कृत्य तसेच वैद्यकीय आणीबाणीबाबत माहिती देण्याकरीता/कळविण्याकरीता पोलीस नियंत्रण कक्ष येथे कार्यरत डायल ११२ वर संपर्क साधावा. कोणत्याही संकटसमयी आपणास डायल ११२ ची मदत २४ तास उपलब्ध असल्याने नागरीकांनी डायल ११२ चा उपयोग न संकोचता करावा. डायल ११२ वर कॉल करणारे कॉलर यांची माहिती गुप्त ठेवण्यात येते.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०५.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण ५१,५३५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करुन ३,४००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१४५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९०,२००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०५.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०६.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०७ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.०८.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत सिरसपेठ, नागुलवार भवनमागे, नाल्याजवळ एका दुचाकीवरील दोन इसम अंमली पदार्थ विक्री करीत आहे. अशा माहितीवरुन, घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, मिळालेल्या वर्णनाचे इसम दिसल्याने त्यांना घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव १) लक्की रामदास मनपिया वय

२२ वर्ष रा. स्वीपर कॉलनी, सिरसपेठ, हनुमान मंदीरजवळ, इमामवाडा, नागपूर असे सांगितले. तसेच दुसरा विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्यांची अंगझडती घेतली असता, आरोपी क्र. १ चे खिशात एक झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एमडी पावडर मिळून आली. विधीसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन मोबाईल फोन व रोख तसेच दुचाकी सुझुकी ॲक्सेस क्र. एमएच ४९ सीवाय ८८९९ ची पाहणी केली असता, गाडीचे डिक्कीमध्ये एका प्लास्टीक पिशवीत अंमली पदार्थ एमडी पावडर मिळून आली. त्यांचे ताब्यातुन एमडी पावडर एकुण वजनी ७० ग्राम ११० मिलीग्राम, ०३ मोबाईल फोन, एमडी पावडर विक्रीचे रोख ६,०००/—रु. व मोपेड असा एकूण ८,७२,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी क्र. १ यास अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी बॉबी मलिक रा. महाल, कोतवाली, नागपूर याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. त्यांचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे इमामवाडा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव इमामवाडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. आरोपींस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत, सपोनि वैभव बारंगे, सफौ. शेख नाजीर, पोहवा. अजय यादव, देवेंद्र नवघरे, निलेश ढोणे, नरेंद्र बांते, लक्ष्मण कळमकर, अतुल चाटे, पोअं. महेश काटवले यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०६.०८.२०२६ चे ०२.५० वा. ते ०४.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीस हे पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना एका विनानंबरच्या बर्गमॅन गाडीवर एक इसम संशयीतरित्या फिरतांना आढळल्याने, त्यास गॅलेक्सी जिमजवळ, सिमेंट रोड, जुनी मंगळवारी, ताजुद्यीन बाबा दर्गा गलीमध्ये सार्वजनिक रोडवर सापळा रचून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव, मोहम्मद सोहेल अब्दुल गफार शेख वय २९ वर्षे, रा. किल्ला रोड, माता मंदीराजवळ, महाल, नागपूर असे सांगीतले. त्याचे जवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीस कायद्यातील तरतुदींचे पालन करुन, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण १५ ग्राम एमडी

पावडर मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एमडी पावडर, मोबाईल फोन, बर्गमन मोपेड गाडी असा एकुण २,८०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी यास अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी मोहम्मद नौशाद इमरान मलिक वय २५ वर्ष रा. दीपनगर, भांडेवाडी, नागपूर याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एमडी पावडर विक्री करण्याकरीता बाळगुन समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे लकडगंज येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि आनंद बिचेवार, पोहवा शेख इमरान, ज्ञानेश्वर भोगे, विवेक आढाव, गणेश जोगेकर, मपोहवा अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे, नितीन राठोड, धनराज मसराम, धनपत मंजरेटे व राहुल पाटील यांनी केली.



**४) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :— फसवणुक करणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी सौ. लक्ष्मी रमेश बुरडे वय ३५ वर्षे, रा. विनोबा भावे नगर, यशोधरानगर, नागपूर यांचा घराचे बांधकामाकरीता लागणाऱ्या सेंट्रींग प्लेट किरायाने देण्याचा व्यवसाय आहे. दिनांक १७.०९.२०२५ ते दि. १२.१२. २०२५ चे दरम्यान, आरोपी शाकीब आरीफ अकबानी वय २९ वर्ष रा. बेलेनगर, कळमणा याने फिर्यादीकडून ३४५ लोखंडी सेंट्रींग प्लेटस् किंमती ४,३०,५६०/—रू. च्या किरायाने घेऊन गेला होता. आरोपीने एक महिन्याचा किराया दिला होता. त्यानंतर आरोपीने किराया न देता व प्लेटस् परत न करता, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन फसवणुक केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ३१६,३१८,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयातील आरोपी हा गुन्हा दाखल झाल्यापासून आपले अस्तित्व लपवून फिरत होता.

गुन्हयाचे तपासात पोलीस ठाणे यशोधरानगर येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपीचा शोध घेवून ताब्यात घेतले. आरोपीचे ताब्यातुन वर नमुद गुन्ह्यातील ३४५ लोखंडी सेंट्रींग प्लेटस् किंमती ४,३०,५६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. युनुस शेख, सपोनि गजानन तेलरांधे, पोहवा राहुल बोंद्रे, पोअं. संदीप वानखेडे व लक्ष्मण पडवाल यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे बेलतरोडी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.०८.२०२६ चे २३.०५ वा. चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सोमवार बाजार, शिल्पा सोसायटीकडे जाणारे रोडवर एक ईसम शस्त्र घेवून धुमाकुळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम धुमाकुळ घालतांना दिसून आला. त्यास ताब्यात घेवून निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अमोल भाऊरावजी किन्नाके वय ३९ वर्षे रा. मु.पो. आंबेनेरी ता. चिमुर जि. चंद्रपुर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेऊन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी सौ. वंदना राजेंद्र फटींग वय ५३ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५, धनगवळी बाबा नगर, खरबी, नागपूर यांची त्यांचे परिचीताचे माध्यमातुन आरोपी विष्णु हरीभाऊ पवार वय ४२ वर्ष रा. सावली बु. ता. जितुर जि. परभणी याचेसोबत ओळख झाली होती. आरोपीने फिर्यादीस अनेक लोकांना नौकरीवर लावल्याचे सांगुन कागदपत्रे व फोटो दाखविले होते. फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन आरोपीने फिर्यादीचे मुलास एअरपोर्ट मध्ये ज्युनिअर एक्झिक्युटीव्ह ऑफीसर या पदावर नौकरी लावून देतो असे सांगून, दिनांक ०५.०७.२०२३ ते दिनांक ०५.१२.२०२४ दरम्यान फिर्यादीकडून वेळोवेळी एकूण ५,०४,०००/— रुपये घेतले व वेळोवेळी वेगवेगळे बहाणे करुन नेहमी टाळाटाळ केली. आरोपीने फिर्यादीचे मुलास नौकरी लावून न दिल्याने, रक्कम परत मागितली असता, आरोपीने रक्कम परत ने देता, फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे मपोउपनि. पुजा शेळके ७४१४९४९६२६ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे हिंगणा :—** दिनांक ०५.०८.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, बोरगाव ते डेगमा रोडवर असलेल्या चक्कीघाटातील एका नाल्याजवळ एका अनोळखी अंदाजे २५ ते ३५ वर्षे वयाचे, इसमाचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत मिळुन आले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन — रंग—निमगोरा, उंची— अंदाजे ५ फुट ५ इंच, बांधा—मजबुत, अंगात— कत्था रंगाचा फुलबाहीचा टिशर्ट ज्यावर समोरील बाजुस इंग्रजीत SQUAD असे लिहलेले, कंबरेत फिक्कट खाकी रंगाचा लोअरपॅन्ट घातलेला असून त्याचे डावे बाजुस इंग्रजीत TIGEO असे लिहलेले असुन डावे हाताचे मध्यमा बोटात पिवळया धातुची अंगठी घातलेली आहे. वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे हिंगणा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी पोलीस पाटील सौ. अनिता रामदास उईके वय ४२ वर्ष रा. वार्ड क्र. १, बिट बोरगाव, हिंगणा यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे सपोनि संदेश नाडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१५१३ /२०१३ | कलम ३९३ भा.दं.वि. | ओमप्रकाश उर्फ ओंकाम उर्फ ओमु गोपाल राऊत रा. सुळे महिला विद्यालयाजवळ, तकीया धंतोली, नागपुर | १०.०८.२०२६ |
| २. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३११४८६ /२०१४ | कलम १४३,१८८ भा.दं.वि. | राहुल हरीहरराव हरणे रा. डी/३, एसटी क्वॉर्टर, विदर्भ बाजारजवळ, नागपुर | ११.०८.२०२६ |
| ३ | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१६११/ २००७ | कलम २९४, ५०६ ब भा.दं.वि. | लतिफ पठान उर्फ बाबा हमिद पठान वय ३० वर्ष रा. चिखली वस्ती, राहुल गांधी नगर झोपडपट्टी, कळमणा, नागपूर | १९.०८.२०२६ |
| ४ | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०२६०२ /२००९ | कलम ३३२, २९४, ५०६ब भा.दं.वि. | अब्दुल यनान उर्फ मुन्ना अब्दुल मजीद वय २५ वर्ष रा. गुलशन नगर विटाभट्टीजवळ, नागपूर | १९.०८.२०२६ |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**